# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.11.2025** **वारःरविवार**

---

छत्तीसगडसह देशाचा प्रत्येक भाग माओवादी हिंसाचारापासून मुक्त होण्याचा दिवस दूर नसल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षीय नेत्यांचा झंझावाती प्रचार

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा

आणि

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात लढत

**<u>पंतप्रधान–छत्तीसगड</u>**

छत्तीसगडसह देशाचा प्रत्येक भाग माओवादी हिंसाचारापासून मुक्त होण्याचा दिवस दूर नसल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. रायपूरमध्ये काल छत्तीसगड रौप्य महोत्सवी समारंभाला संबोधित करताना सरकारनं देशाला नक्षलवादाच्या संकटापासून मुक्त करण्याचा संकल्प केल्याचं सांगून परिणामी, देशातील अकरा वर्षांपूर्वीच्या माओवादी हिंसाचारग्रस्त जिल्ह्यांची संख्या एकशे पंचवीस वरून केवळ तीन जिल्ह्यांपुरती मर्यादित झाल्याचं पंतप्रधानांनी म्हंटलं आहे.

या प्रसंगी, पंतप्रधानांनी चौदा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचं उद्‌घाटन आणि पायाभरणी केली. हे प्रकल्प प्रामुख्यानं रस्ते, उद्‌योग, आरोग्यसेवा आणि ऊर्जा क्षेत्राशी संबंधित आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, छत्तीसगडमधील सुमारे साडेतीन लाख कुटुंबांनी काल त्यांच्या नवीन पक्क्या घरात प्रवेश केला.

रायपूरच्या एक दिवसीय दौऱ्यादरम्यान, काल पंतप्रधान मोदींनी छत्तीसगड विधानसभेच्या नवीन इमारतीचं उद्‌घाटन केलं तसंच इमारतीच्या आवारात माजी पंतप्रधान आणि भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरणही केलं. त्यांनी नवा रायपूर इथल्या शहीद वीर नारायण सिंह स्मारक आणि आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालयाचंही लोकार्पण केलं. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी 'दिल की बात' कार्यक्रमांतर्गत नवा रायपूर इथल्या श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयात सुमारे दोन हजार पाचशे मुलांशी संवाद साधला. आध्यात्मिक शिक्षण, शांती आणि ध्यानाचं आधुनिक केंद्र असलेल्या ब्रह्मकुमारींच्या शांती शिखराचं नवा रायपूर इथं पंतप्रधानांनी उद्‌घाटन केलं.

**पंतप्रधान-बिहार**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भोजपुर आणि नवादा इथं दोन प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान सायंकाळी ५ वाजता पाटणा इथं राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करून ते एनडीए उमेदवारांच्या समर्थनार्थ पाटणा इथं एका भव्य प्रचार फेरीमध्ये सहभागी होतील. पंतप्रधान मोदी पाटणा शहरातील तख्त श्री हरिमंदिर साहिब गुरुद्वारालाही भेट देणार आहेत.  या व्यतिरिक्त, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुझफ्फरपूर आणि वैशाली इथं प्रचार सभांना संबोधित करतील. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी बेगुसराय आणि खगरिया इथं दोन सभांना संबोधित करतील, तर महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव मुंगेर, पाटणा, वैशाली आणि सारण इथं विविध निवडणूक सभांना उपस्थित राहतील.

**राष्ट्रपती-दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून उत्तराखंडच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. राष्ट्रपती आज हरिद्वार इथल्या पतंजली विद्यापीठाच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

उत्तराखंड राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त उद्या डेहराडून इथं उत्तराखंड विधानसभेला राष्ट्रपती संबोधित करतील. त्यानंतर त्या नैनितालमधील राजभवनाच्या स्थापनेच्या १२५ वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमातही सहभागी होतील.

मंगळवारी, राष्ट्रपती कैंची धाम इथल्या नीम करोली बाबा आश्रमाला भेट देतील. त्यानंतर, त्या नैनिताल मधील कुमाऊँ विद्यापीठाच्या २० व्या दीक्षांत समारंभालाही उपस्थित राहतील.

**इस्रोप्रक्षेपण**

भारतीय अवकाश संशोधन संस्था म्हणजे इस्रो आज देशातला सर्वांत वजनदार उपग्रह सीएमएस-03 प्रक्षेपित करणार आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित होणाऱ्या उपग्रहाच्या प्रक्षेपणाची उलटगणती सुरू झाली आहे. हा संप्रेषण उपग्रह असून भारतीय भूभागासह विस्तृत महासागरीय प्रदेशात सेवा प्रदान करणार आहे.  इस्रोचा सर्वांत ताकदवान प्रक्षेपक एलएमव्ही 3 मधून हा उपग्रह अंतराळात झेपावेल.

**नायजेरीयाट्रम्प**

नायजेरियामध्ये ख्रिश्चन समुदायावर हिंसाचार होत असल्याचा आरोप करत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन लष्कराला नायजेरियावरील संभाव्य कारवाईसाठी तयार राहाण्याचे आदेश दिले आहेत. या संदर्भात समाज माध्यमांवरील संदेशात ट्रम्प यांनी ख्रिश्चन नागरिकांच्या हत्येविरोधात कारवाई करण्यास नायजेरिया अपयशी ठरल्यास त्यांना दिली जाणारी अमेरिकन मदत तत्काळ थांबवण्यात येईल

असं म्हटलं आहे. दरम्यान, नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांनी नायजेरिया धार्मिक स्वातंत्र्य आणि सहिष्णुता कायम राखण्यास वचनबद्ध असल्याचं म्हटलं आहे.

**गीतामहोत्सव**

सौदी अरेबियाची राजधानी रियाधमधील भारतीय दूतावासानं आयोजित केलेल्या प्रवासी परिचय 2025 या कार्यक्रमाचा समारोप गीता महोत्सव या संगीतमय कार्यक्रमानं होणार आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमातून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचं दर्शन घडणार आहे.

**विठ्ठलसाकडं**

महाराष्ट्रातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांवरचं संकट दूर होऊ दे; बळीराजाला सुखीकर असं साकडं राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विठ्ठलाला घातलं. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने आज पहाटे पंढरपुरात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सपत्नीक विठ्ठलाची शासकीय महापूजा केली. त्यानंतर ते बोलत होते. महाराष्ट्रासह, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि इतर राज्यांतून सुमारेआठ लाख भाविक पंढरपूरात दखल झाले असून ‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’च्या जयघोषानं परिसर दुमदुमला आहे.

**संगीत**

सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्यानंप्रसार प्रसार भारती आजपासून या महिन्याच्या २९ तारखेपर्यंत देशभरातील २४ केंद्रांवर ६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं आयोजित करत आहे. १९५४ मध्ये आकाशवाणी संगीत संमेलन सुरू झालं; ते भारतातील प्रतिष्ठित सांस्कृतिक परंपरांचं ते प्रतीक असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हंटलं आहे. या संमेलनात देशभरातील श्रोत्यांना हिंदुस्थानी, कर्नाटक आणि लोकसंगीताची मेजवानी मिळेल. भारताच्या समृद्ध संगीत वारशाचं जतन, प्रचार आणि लोकप्रियता वाढवण्यात या संमेलनानं  महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

संमेलनाची माहिती देताना, प्रसार भारतीचे मुख्यल कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी म्हणाले की, कोविड-१९ साथीमुळे काही काळासाठी पडलेल्या खंडानंतर या वर्षी हा भव्य महोत्सव नव्या जोमानं आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीच्या संमेलनात प्रत्येक ठिकाणी भारतीय शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत यांना समर्पित अशा दोन संगीत मैफिली असतील. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित अरुण कशाळकर उपस्थित राहणार आहेत.

पणजी आणि शिलाँग इथं पाश्चात्य संगीताचं सादरीकरण करण्यात येईल.

**वेंकटेश्वर-स्वामी-मंदिर**

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू आणि आंध्र प्रदेशचे माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री नारा लोकेश यांनी काल रात्री कासीबुग्गा इथल्या वेंकटेश्वर स्वामी मंदिराला भेट दिली. या ठिकाणी परवा झालेल्या चेंगराचेंगरीत नऊ जणांचा मृत्यू झाला होता तसंच अनेक जण जखमी झाले आहेत. उभय

नेत्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पलासा आरोग्य केंद्रात जखमींची भेट घेतली आणि शोकाकुल कुटुंबांचं सांत्वन केलं.

प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबाला १५ लाख रुपये आणि जखमींना राज्य सरकारकडून ३ लाख रुपये मदत लोकेश यांनी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान मदत निधीतून २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये भरपाई जाहीर केली.

**<u>फॅक्टचेक</u>**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या संदर्भात धार्मिक मुद्द्यांवर विधाने केल्याचा दावा करणाऱ्या, समाज माध्यमांवर फिरणाऱ्या व्हिडिओचं सरकारनं खंडन केलं आहे. पीआयबीनं अर्थात प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या तथ्य तपासणी विभागानं दिलेल्या माहितीनुसार हा व्हिडिओ एआय अर्थात कृत्रिम बुद्दीमत्तेवर आधारित तयार केला गेला असून पाकिस्तान समर्थक हँडलद्वारे प्रसारित केला जात आहे. पंतप्रधानांनी असं कोणतंही विधान केलं नसल्याचं पीआयबीनं म्हंटलं असून अशा माहितीसाठी नागरिकांना केवळ अधिकृत स्रोतांवर अवलंबून राहण्याचं आवाहन पीआयबीनं केलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**
भारत आणि ऑस्ट्रेलिया पुरुष क्रिकेट संघांदरम्यान वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना होबार्टमधील ओव्हल मैदानावर आज होत आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी पावणे २ वाजता सुरू होईल. मेलबोर्न इथं झालेला दूसरा सामना ४ गडी राखत जिंकून ऑस्ट्रेलिया संघ पाच सामन्यांच्या मालिकेत १-० असा आघाडीवर आहे. मालिकेतील पहिला सामना पावसामुळं रद्द करण्यात आला होता.

**<u>महिलाक्रिकेट</u>**
आयसीसी महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकात, आज नवी मुंबईतील डीवाय पाटील मैदानावर भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. दुपारी ३ वाजता सामन्याला सुरुवात होईल. दोन्ही संघांनी अद्याप या स्पर्धेचं विजेतेपद एकदाही जिंकलेलं नसल्यानं यावेळी स्पर्धेला नवीन विजेता लाभेल. २०१७ मध्ये भारतीय महिला संघ विजेतेपदाच्या जवळ पोहोचला होता. तथापि, अंतिम सामन्यात त्यांना इंग्लंडच्या संघाकडून केवळ ९ धावांनी पराभव पत्करावा लागला होता. यापूर्वी तीन वेळा एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीपर्यंत मजल मारणारा दक्षिण आफ्रिका महिला संघ प्रथमच अंतिम सामन्यात खेळत आहे. गुवाहाटी इथं झालेल्या पहिल्या उपांत्य फेरीत इंग्लंडवर १२५ धावांनी विजय मिळवून दक्षिण आफ्रिकेनं अंतिम फेरीत प्रवेश केला. तर गुरुवारी नवी मुंबई इथं झालेल्या उपांत्य सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा ५ खेळाडू राखत पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं आज अंदमान आणि निकोबार बेटांवर मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. गुजरात आणि मध्य प्रदेशातील काही ठिकाणी दिवसा जोरदार वारे आणि विजांसह पावसाची शक्यता आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार